# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. ०७१२— २५५७२६६

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website : rdtenagpur.org.in**

परिपत्रक

क्रमांक : तंशिस/विकाना/ई.बी.सी/परदेशी शिष्यवृत्ती/२०१९/ 2420

दि. 7 AUG 2019

विषय:— उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " या योजनेंतर्गत सन २०१९—२० करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत.

संदर्भ :— मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १९/डीटीई/परदेशी शिष्यवृत्ती/२०१८/१८०, दि. ०६/०८/२०१९.

दिनांक ०४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागातंर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना" जाहीर करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिताची जाहिरात दिनांक २२ जून २०१९ रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. अर्ज **online** पध्दतीने करावयाचे असून अर्ज करण्यांची वाढीव मुदत दिनांक २९ जूलै २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत होती. तसेच **online** भरलेल्या अर्जांची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती या विभागीय कार्यालयास सादर करण्यांकरिताची वाढीव मुदत ३१ जुलै २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत होती.

संदर्भिय परिपत्रकान्वये सदरची मुदत वाढवून आता विद्यार्थ्यांना **online** पध्दतीने अर्ज करण्यांची मुदत २९ जुलै २०१९ वरुन दिनांक १५ ऑगस्ट २०१९ अशी करण्यांत येत आहे. तसेच **online** भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती या विभागीय कार्यालयास सादर करण्यांकरिताची मुदत दिनांक ३१ जुलै २०१९ वरुन दिनांक १९ ऑगस्ट २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत वाढविण्यांत आली आहे.

(डॉ.सी.एस.थोरात )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.